**ई-गव्हर्नन्समध्ये पर्यावरण विभाग पाचव्या स्थानी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विशेष गौरव** >> पान 2

**प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हतेच्या त्रिसूत्रीवर सर्व विभागांनी काम करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** >> पान 3

**मेहकरात धमकीच्या व्हिडिओवरुन खळबळ** >> पान 4


### सुविचार

चांगला स्वभाव हा गणितातल्या शुन्यासारखा असतो


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 229 ■ रविवार, दि. 29 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**मराठी अभिनेत्रीला झाला ब्रेस्ट कॅन्सर**

आतील पान

## महाराष्ट्रात पीएनजी नेटवर्कच्या विस्तारासाठी केंद्र सरकारने आर्थिक, तांत्रिक पाठबळ द्यावे : मंत्री छगन भुजबळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्रात पाईपद्वारे नैसर्गिक वायू पुरवठा करणाऱ्या नेटवर्कचा विस्तार अधिक वेगाने करण्यासाठी केंद्र सरकारने तांत्रिक सहाय्य आणि पायाभूत सुविधांसाठी विशेष आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली.

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. ही बैठक केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर (शहरी विकास व गृहनिर्माण) आणि हरदीप सिंग पुरी (पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू) यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीला केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी, हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेशचे नगरविकास व अन्न नागरी पुरवठा मंत्री, केंद्रीय सचिव तसेच महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर आणि विविध महानगरपालिकांचे आयुक्त व नैसर्गिक वायू कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी पीएनजी विस्तारासाठी राज्य सरकारने उचललेल्या क्रांतिकारी पावलांची माहिती दिली. ते म्हणाले की, अनेकदा शेजाऱ्यांची संमती न मिळणे किंवा महानगरपालिकेच्या रस्ते खोदाईच्या परवानग्यांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे गॅस पाईपलाइन टाकण्याचे काम रेंगाळते. ही अडचण दूर करण्यासाठी आता 'डीम्ड परमिशन' (गृहित परवानगी) तत्त्व लागू करण्यात आले आहे. यानुसार, पाईपलाइन टाकण्यासाठी विविध विभागांकडे परवानगी मागितल्यानंतर ठराविक वेळेत प्रतिसाद न मिळाल्यास, ती परवानगी मिळाली आहे असे समजून काम पुढे नेता येईल. तसेच, नवीन गृहनिर्माण प्रकल्पांना 'भोगवटा प्रमाणपत्र' मिळवण्यासाठी पीएनजी जोडणी असणे आता बंधनकारक करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या सोसायट्यांमध्ये गॅस पाईपलाइन पोहोचली आहे, तिथे पालिकेच्या अटींनुसार जोडणी घेतल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र दिले



जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील शहरांमध्ये एलपीजी सिलिंडरचा वापर कमी करून पीएनजीचे जाळे विस्तारण्यासाठी राज्य सरकार अधिक कठोर आणि गतिमान पावले उचलत आहे. हॉटेल, रेस्टॉरंट आणि लघुउद्योगांसाठी पीएनजीचा वापर वाढवणे गरजेचे असून, यामुळे खर्च कमी होऊन पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होईल. यासाठी परवाना व जोडणी प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या सूचना भुजबळ यांनी केल्या.

गॅस वितरण संस्थांना आता २४ तास काम करण्याची परवानगी देण्यात आली असून, त्यांच्यासाठी कामकाजाचा हंगामही शिथिल करण्यात आला आहे. तसेच, रस्ते पूर्ववत करण्यासाठी लागणारे शुल्क माफ करण्याच्या मार्गदर्शक सूचना कालच शासन निर्णयाद्वारे देण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत प्रशासकीय समन्वय राखण्यासाठी नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांना राज्याचे नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. हे आदेश ३० जून २०२६ पर्यंत अंमलात राहतील.

पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत बोलताना मंत्री भुजबळ यांनी स्पष्ट केले की, राज्यातील रिफायनरींमध्ये पुरेसा साठा उपलब्ध असून प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर वाढवून एलपीजीची टंचाई भासणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. ग्रामीण भागात सिलिंडरचा पुरवठा पूर्वीप्रमाणेच सुरू राहील.

तसेच, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्याला मिळणारा सुमारे ३,७६८ किलो लिटर रॉकेलचा कोटा दरमहा उपलब्ध करून दिला जात असून रेशन दुकानांमार्फत होणारा पुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर दिला जात आहे. शेवटी, राज्यात पुन्हा टाळेबंदी (लॉकडाऊन) लागणार असल्याच्या अफवांचे खंडन करत, जनतेने कोणत्याही चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी केले.

## काँग्रेस पक्षाची सोमवार ३० मार्चला सुरतगाव ते तुळजापूर 'शेतकरी संघर्ष न्याय यात्रा'.

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांच्या हक्कासाठी 'शेतकरी संघर्ष न्याय यात्रा' आयोजित केली असून सोमवारी ३० मार्च रोजी धाराशीव जिल्ह्यातील सुरतगाव ते तुळजापूर अशी पदयात्रा निघणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या संघर्ष यात्रेत पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी व शेतकरी सहभागी होणार आहेत. पदयात्रेची सुरुवात सोलापूर तुळजापूर महामार्गावरील सुरतगाव येथून सकाळी ८ वाजता होणार असून संध्याकाळी ५ वाजता तुळजापूर येथील शारदा मंगल कार्यालयात सभेने या यात्रेचा समारोप होणार आहे.

भाजपा सरकारच्या उद्योगपतीधार्जिण्या धोरणांमुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही,शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या भाजपा सरकारच्या वल्गना हवेतच विरल्या आहेत.भाजपा सरकार एमएसपीचा कायदाही करत नाही. हमीभावापेक्षा कमी भाव देणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या घोषणाही भाजपा सरकारने केल्या पण त्याही कागदावरच राहिल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे, तर मोदी सरकारने अमेरिकेबरोबर व्यापारी करार करून शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. या करारामुळे भारतातील शेती व शेतकरी उद्ध्वस्थ होणार आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी काँग्रेस संसद, विधिमंडळ व रस्त्यावरही लढत असून, या संघर्ष यात्रेत शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने केले आहे.

## उद्योगवाढीसाठी राज्यात परवाने प्रक्रिया झाली सुलभ

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात उद्योग सुलभतेसाठी परवानगी प्रक्रियेत मोठे बदल करण्यात आले असून ३३ परवानग्यांपैकी २० परवानग्या स्व-प्रमाणनावर (सेल्फ सर्टिफिकेशन) आणण्यात आल्या आहेत. उर्वरित १३ परवानग्यांची संख्याही लवकरच कमी करण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली. मुख्यमंर्त्यांच्या अध्यक्षतेखाली रामकी ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज आणि एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'बल्क ड्रग पार्क' व 'लाइफ सायन्सेस हब' उभारण्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, उद्योग प्रधान सचिव डॉ. पी.अन्बळगन, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्योजकांना विश्वास देताना सांगितले की, राज्यातील वीजदर पुढील पाच वर्षात टप्प्याटप्प्याने कमी होणार आहेत. सध्या असलेला १०.८८ रुपये प्रति युनिट हा वीजदर पुढील पाच वर्षात १५.८७ रुपये इतका न होता कमी होऊन ९.९७ रुपयांखाली येणार असून २०२८-२९ पर्यत महाराष्ट्र देशातील सर्वात कमी वीजदर असलेले राज्य ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला.




## जिल्हा परिषदेच्या ई -गव्हर्नन्स व सेवाकर्मी उपक्रमांची राज्यस्तरावर दखल -मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विशेष गौरव



**नागपूर/प्रतिनिधी :** शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स विशेष मोहिमेत आणि सेवाकर्मी कार्यक्रमात नागपूर जिल्हा परिषदेणे उल्लेखनीय कामगिरी नोंदवत डिजिटल, पारदर्शक व नागरिकाभिमुख प्रशासनाच्या दिशेने प्रभावी वाटचाल केली आहे.

या मोहिमेअंतर्गत उत्कृष्ट कार्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदने Website Compliance, Aaple Sarkar, e-Office, Dashboard, WhatsApp Chatbot, AI/Blockchain आणि GIS या निकषांवर प्रभावी कामगिरी केली.

तसेच "सेवाकर्मी" उपक्रमांतर्गत आकृतिबंध, सेवाप्रवेश नियम, अद्ययावत ज्येष्ठता सूची, पदोन्नतीनुसार नियुक्ती स्थिती, सरळसेवा रिक्त पदे, बिंदुनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, iGOT पोर्टल नोंदणी व प्रशिक्षण, तसेच सेवापुस्तक अद्ययावतीकरण या महत्त्वपूर्ण बाबींमध्येही उल्लेखनीय प्रगती साधण्यात आली. या सर्व उपक्रमांमुळे जिल्हा परिषद मार्फत तंत्रज्ञानाधारित, शिस्तबद्ध, उत्तरदायी आणि परिणामकारक प्रशासन अधिक सक्षम झाले आहे.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी सांगितले की, "ई-गव्हर्नन्स आणि सेवाकर्मी सुधारणा या माध्यमातून नागरिकांना अधिक जलद, सुलभ व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर सातत्याने भर राहील." असे यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी सांगितले.

## राज्यात १ एप्रिलपासून वीजदरात कपात

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील लाखो वीज ग्राहकांसाठी दिलासादायक बातमी असून, येत्या १ एप्रिलपासून वीजदरात कपात लागू होणार आहे. १०० युनिटपर्यत वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांसाठी प्रति युनिट दरात सुमारे एक रुपयाची कपात करण्यात आली असून, आता त्यांना ८.१४ रुपयांऐवजी ७.१० रुपये मोजावे लागणार आहेत. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने महावितरणच्या पाच वर्षाच्या वीजदर कपात याचिकेला मंजुरी दिल्याने हा मार्ग मोकळा झाला आहे.

गेल्या वर्षभरापासून ही याचिका न्यायालयीन प्रक्रियेत अडकली होती. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार, तांत्रिक बाबींची पूर्तता करून आयोगाने आता नवा आदेश प्रसिद्ध केला आहे. या निर्णयामुळे आगामी पाच वर्षात टप्प्याटप्प्याने वीजदर कमी होणार आहेत.




नवीन दरपत्रकानुसार, घरगुती ग्राहकांसाठी १०० ते ३०० युनिटपर्यतचा दर १३.२३ रुपयांवरून १२.९४ पैसे इतका कमी झाला आहे. औद्योगिक ग्राहकांसाठीही दिलासा मिळाला असून, त्यांचा दर १०.८८ रुपयांवरून १०.७१ पैसे करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांच्या सवलती महावितरणने कायम ठेवल्या आहेत. दरम्यान, पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्यासाठी आयोगाने ई-वाहन चार्जिंग स्टेशनसाठी २०२६-२७ या वर्षासाठी ९.५० रुपये प्रति युनिट दर निश्चित केला आहे. हा दर २०२८-२९ पर्यत स्थिर राहणार आहे. यामुळे मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांना आपल्या आवारात लघुदाब चार्जिंग केंद्र सुरू करणे अधिक परवडणारे होणार आहे.

पाच वर्षाचे वीजदर (प्रति युनिट रुपयांत)

| वापर (युनिट) | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | २०२८-२९ | २०२९-३० |
|---|---|---|---|---|---|
| ०-१०० | ८.१४ | ७.१० | ७.०० | ६.२० | ६.०० |
| १०१-३०० | १३.२३ | १२.९४ | १२.७९ | १२.६२ | १२.६२ |
| ३०१-५०० | १७.७८ | १७.३५ | १७.२७ | १६.३८ | १६.३५ |
| ५०० पेक्षा जास्त | १९.२३ | १९.१४ | १९.०४ | १८.४७ | १८.४७ |

### राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळणार


वीजदर कपातीबाबत गेले वर्षभर आयोग, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या पातळीवर विविध सुनावण्या झाल्या. आता संपूर्ण वैधानिक प्रक्रिया पूर्ण करून आयोगाकडून आदेश आल्यामुळे स्पष्टता व निश्चितता आली आहे. वीजदर कपातीच्या आदेशामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे.

**-विश्वास पाठक, स्वतंत्र संचालक, महावितरण**

## प्रशासनाचा दणका; चिखलीत नियमांचे उल्लंघन करून इंधन विक्री करणाऱ्या पेट्रोल पंप मालकावर फौजदारी गुन्हा दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासकीय नियमांचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष खबरदारी घेतली जात आहे. जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या आदेशानुसार, सर्व पेट्रोल पंपांवर इंधन केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच वितरित करणे बंधनकारक असून कॅन, बाटली किंवा इतर उघड्या कंटेनरमध्ये इंधन देणे सुरक्षिततेच्या कारणास्तव प्रतिबंधित करण्यात आले आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध आता प्रशासनाने कडक पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे.






चिखली येथील जालना रोडवर असलेल्या रेणुका पेट्रोल पंप येथे दि. २६ मार्च २०२६ रोजी प्रशासकीय सूचनांकडे दुर्लक्ष करून अनधिकृतपणे खुल्या टाक्या आणि बाटल्यांमध्ये इंधन विक्री होत असल्याचे निदर्शनास आले.

अशा प्रकारच्या बेकायदेशीर विक्रीमुळे सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, ही बाब लक्षात घेऊन तहसील कार्यालय चिखली येथील पुरवठा निरीक्षक रविंद्र संजय वाघ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चिखली पोलीस ठाण्यात संबंधित पेट्रोल पंप मालकावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ आणि २८७ अन्वये ही कारवाई करण्यात आली असून पोलीस हवालदार कैलास गोपाळराव चाटारकर या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

प्रशासनाकडून जनतेला आवाहन करण्यात येते की, इंधन पुरवठा पुरेसा असून नागरिकांनी विनाकारण साठवणूक करू नये. तसेच, सर्व पेट्रोल पंप चालकांनी शासनाने ठरवून दिलेल्या सुरक्षा नियमांचे पालन करूनच इंधन वितरण करावे. नियमांचे उल्लंघन करून सार्वजनिक सुरक्षेला बाधा पोहोचवणाऱ्या घटकांवर यापुढेही कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

## सरकार नागरिकांच्या बाजूने भक्कम उभे

जागतिक तेल दरवाढ, रुपयाची ऐतिहासिक घसरण आणि महागाईच्या दबावात केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्कात काल कपात करून नागरिकांना दिलासा देण्याचे मोलाचे काम केले. महसुलात घट पत्करूनही लोककेंद्रित निर्णय घेण्याची मोदी सरकारची भूमिका यातून स्पष्ट होत असून, अर्थकारण आणि राजकारणाचा समतोल साधण्याचा प्रयत्न त्यातून स्पष्ट दिसतो. इंधन दरांवरील करकपात म्हणजे फक्त काही रुपयांची सवलत नाही; तर ती सरकारच्या आर्थिक प्राधान्यक्रमांची आणि राजकीय संवेदनशीलतेची कसोटी असते. केंद्र सरकारने पेट्रोलवरील उत्पादन शुल्क १३ रुपयांवरून तीन रुपयांपर्यंत आणणे आणि डिझेलवरील अतिरिक्त शुल्क जवळपास शून्यावर आणणे, हा निर्णय या कसोटीवर नेमकेपणाने उतरतो. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीतील अस्थिरता, डॉलरच्या तुलनेत रुपयाची होत असलेली घसरण आणि महागाईचा वाढता दबाव या सगळ्या पार्श्वभूमीवर घेतलेला हा निर्णय सामान्य नागरिकांना दिलासा देणारा आहे; पण त्यामागील अर्थकारण हे अधिक खोलवरचे आहे. त्याचे आकलन म्हणूनच विस्ताराने करावे लागेल. भारत हा तेल आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेला देश. जागतिक बाजारात तेल महागले की, त्याचा थेट परिणाम देशांतर्गत महागाईवर होतो. वाहतूक खर्च वाढतो, शेतीचा खर्च वाढतो, उद्योगांचे उत्पादन खर्च वाढतात आणि अखेरीस ग्राहकांवर त्याचा भार पडतो. अशा वेळी सरकारसमोर दोनच पर्याय असतात; एकतर बाजाराच्या हवाली सर्वकाही सोडून महागाई वाढू द्यावी किंवा करकपात करून महसुलात घट स्वीकारावी. केंद्र सरकारने दुसरा पर्याय निवडला आहे. उत्पादन शुल्क हा केंद्र सरकारच्या महसुलाचा महत्त्वाचा स्रोत. पेट्रोल आणि डिझेलवरील प्रत्येक रुपयाच्या कपातीमागे हजारो कोटी रुपयांचे नुकसान दडलेले असते. तरीही, ही कपात केली जाते. याचा अर्थ, सरकारने तत्काळ महसुलापेक्षा दीर्घकालीन आर्थिक स्थैर्याला प्राधान्य दिले आहे. कारण इंधनदर वाढले की, महागाई वाढते आणि महागाई वाढली की, अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांवर त्याचे नकारात्मक परिणाम होतात. त्यामुळे इंधनदर नियंत्रणात ठेवणे हे केवळ राजकीय नव्हे, तर आर्थिक गरज बनते. या संपूर्ण चर्चेत एक मूलभूत प्रश्न कायम राहतो आणि तो म्हणजे, भारताचे ऊर्जेवरील अवलंबित्व. जोपर्यंत भारत तेल आयातीवर अवलंबून आहे, तोपर्यंत इंधनदरांचे राजकारण आणि अर्थकारण असेच चालू राहणार. सौरऊर्जा, विद्युत वाहने, जैवइंधन, सार्वजनिक वाहतूक यांसारख्या पर्यायांचा विस्तार झाला, तरच या समस्येवर दीर्घकालीन उपाय मिळू शकतो. सरकार त्या दिशेने प्रयत्न करत असले, तरी हा बदल हळूहळू होणार आहे. म्हणूनच, इंधनावरील करकपात हा केवळतात्पुरता दिलासा नसून, व्यापक आर्थिक समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. यात राजकारण आहे, अर्थकारण आहे आणि धोरणात्मक दूरदृष्टीही. करकपात करून सरकारने महसुलात घट स्वीकारली; पण त्यातून महागाईवर नियंत्रण ठेवण्याचा आणि नागरिकांनादिलासा देण्याचा प्रयत्न केला. यामध्ये आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे तेल कंपन्या. भारतात इंधनदर पूर्णपणे मुक्त बाजारावर आधारित असले, तरी प्रत्यक्षात सरकार, तेल कंपन्या आणि जागतिक बाजार यांच्यात एकप्रकारचा संतुलनाचा खेळ चालतो. जागतिक दर वाढले, तरी कंपन्या लगेच दरवाढ करत नाहीत; त्यांचा तोटा वाढतो. अशा वेळी सरकार करकपात करून त्या तोट्याला मर्यादा घालते. म्हणजेच, हा निर्णय केवळ ग्राहकांसाठी नसून संपूर्ण ऊर्जाव्यवस्थेचा समतोल राखण्यासाठी असतो. पण, मोदी सरकारच्या कारकिर्दीत नागरिकांना दिलासा देण्याची ही पहिलीच वेळ नाही. 'कोरोना' महामारीच्या अभूतपूर्व संकटात मोफत धान्य योजना राबवली गेली, लसीकरण पूर्णपणे मोफत केले गेले आणि गरिबांच्या हातात थेट मदत पोहोचवली गेली. त्याकाळातही सरकारने महसुलातील तुटीचा विचार न करता, लोककल्याणाला प्राधान्य दिले. आजच्या इंधन करकपातीचा निर्णयही त्याच धोरणाचा विस्तार आहे. अर्थकारणाच्या पातळीवर पाहिले, तर हा निर्णय सहजसाध्य नाही. एकीकडे रुपयाची घसरण सुरू आहे. डॉलर मजबूत होत असताना, आयात खर्च वाढतो. तेलासारख्या महत्त्वाच्या वस्तूंसाठी अधिक पैसे मोजावे लागतात. तरीही, सरकारने करकपात केली आहे. यामागे एक व्यापक धोरण दिसते आणि ते म्हणजे जागतिक व्यापारात स्थानिक चलनाचा वापर वाढवण्याचा केलेला प्रयत्न. डॉलरवरील अवलंबित्व कमी करून रुपयात व्यापार वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे दीर्घकालीन दृष्टीने चलनावरील दबाव कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. याच वेळी देशातील राजकीय वातावरणात काही वेगळेच चित्र रंगवण्याचा प्रयत्न झाला. इंधनावरील करकपातीचा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचत नाही, असा आरोप काँग्रेसतर्फे करण्यात आला. परंतु, इतिहासात डोकावल्यास वेगळेच वास्तव दिसते. मनमोहन सिंग यांच्या काळात 'पैसे झाडावर उगवत नाहीत,' असे जनतेला उद्देशून सांगण्यात आले होते. त्याकाळातही इंधन दरवाढीचा फटका सर्वसामान्यांना बसला होता. 'एलपीजी' सिलिंडरच्या किमतीतील वाढीमुळे घरगुती बजेट कोलमडले होते. मात्र, आज त्याचा विसर काँग्रेसी नेत्यांना आज सोयीस्कररीत्या पडलेला दिसतो. हे कमी काय म्हणून इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर पुन्हा देशात 'लॉकडाऊन लागू होण्याची अफवाही पसरवण्यात आली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी याचे काय परिणाम होतील, याची तमा न बाळगता याबाबत बेजबाबदारपणे विधान केले. मात्र, केंद्र सरकारने तत्काळ स्पष्ट केले की, 'लॉकडाऊन' लागू करण्याची कोणतीही योजना नाही. उलट, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावून परिस्थितीचा आढावा घेतला. यामधून संकटाला सामोरे जाण्याचा समन्वयात्मक दृष्टिकोन दिसतो. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा मुद्दा पुढे येतो आणि तो म्हणजे भारताची आर्थिक ताकद. जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील, असा अंदाज 'ओईसीडी'ने नुकताच व्यक्त केला आहे. ही केवळ आकडेवारी नाही; ती धोरणात्मक स्थैर्याची पावती आहे. महागाई, चलन घसरण, जागतिक तणाव अशा अनेक आव्हानांमध्येही भारताने आपली वाढ कायम ठेवली आहे. हा निर्णय एका मोठ्या वास्तवाकडे निर्देश करतो. सरकारचा कारभार हा फक्त आकडेवारीवर चालत नाही; प्रत्यक्षात तो लोकांच्या जीवनाशी जोडलेला असतो. पेट्रोल-डिझेलचे दर हे फक्त आकडे नसतात; ते प्रत्येक घराच्या बजेटचा अपरिहार्य भाग असतात. त्या बजेटमध्ये दिलासा देणे म्हणजेच, अर्थकारणाला मानवी चेहरा देणे होय. आगामी काळात जागतिक परिस्थिती कशी बदलते, तेलाचे दर कसे राहतात आणि भारत ऊर्जा स्वावलंबनाकडे कितपत वेगाने वाटचाल करतो, यावर या निर्णयाचे दीर्घकालीन परिणाम अवलंबून राहतील. पण, सध्याच्या परिस्थितीत हा निर्णय एक स्पष्ट संदेश देतो. संकटाच्या काळात सरकार नागरिकांच्या बाजूने भक्कमपणे उभे आहे. केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत अनेकदा हे कृतीतून दाखवून, लोककल्याण हेच सरकारचे प्राधान्य असल्याचे सिद्ध केले आहे.

# ई-गव्हर्नन्समध्ये पर्यावरण विभाग पाचव्या स्थानी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विशेष गौरव

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या '१५० दिवसांच्या कृती आराखडा' अंतर्गत राबविण्यात आलेल्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमात पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत १५९.२९ गुणांसह मंत्रालयीन विभागांमध्ये पाचवे स्थान पटकावले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागाच्या सचिव जयश्री भोज यांचा आज गौरव करण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.



या उपक्रमाच्या यशाबद्दल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत आम्ही नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा देण्यावर भर दिला. ई-ऑफिस, डॅशबोर्ड, पोर्टल एकात्मिकरण आणि नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विभागाची कार्यक्षमता लक्षणीय वाढली आहे. पुढील काळातही डिजिटल सेवा अधिक सक्षम करण्यावर आमचा भर राहील.

विभागाच्या कामकाजात गती आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा अजित पवार तसेच विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

१५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने डिजिटल सेवा, पारदर्शकता आणि नागरिकाभिमुख उपक्रमांवर विशेष भर दिला. विभागाच्या संकेतस्थळावर सुमारे ३,००० नागरिक दररोज भेट देत असून ते दिव्यांगांसाठी सुलभ (WC-G 2.1) आणि सायबर सुरक्षिततेच्या निकषांनुसार विकसित करण्यात आले आहे.

'आपले सरकार' पोर्टलवर विभागाच्या सर्व ७ सेवा पूर्णपणे ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच मैत्री, ईसीएमपीसीबी (ECMPCB) आणि इतर पोर्टलशी एकात्मिक व्यवस्था तयार करण्यात आली असून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सेवा मिळू लागल्या आहेत.

ई-ऑफिस प्रणालीमुळे कामकाजाला गती मिळाली असून मे २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत सुमारे ५,४५० फाईल्स निकाली काढण्यात आल्या आहेत. सरासरी ७ दिवसांत फाईल निपटारा होत असल्याने प्रशासन अधिक कार्यक्षम झाले आहे.

तक्रार निवारण यंत्रणेतही सुधारणा करण्यात आली असून बहुतांश तक्रारी ७ ते १५ दिवसांत निकाली काढल्या जात आहेत. तसेच डॅशबोर्ड प्रणालीमुळे कामकाजाचे रिअल-टाईम निरीक्षण शक्य झाले आहे.

याशिवाय, व्हॉट्सॲप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक सोप्या आणि पारदर्शक करण्याचा प्रयत्न सुरू आहे. बांधकाम व पाडकाम कचरा परवानगी सेवा व्हॉट्सॲपद्वारे देण्याचा अभिनव उपक्रमही राबविण्यात येत आहे.

या यशामुळे पर्यावरण विभागाच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळाली असून नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देण्यास मदत होणार आहे.

# समुद्रात जाणारा कचरा रोखण्यासाठी आवश्यक त्याठिकाणी 'ट्रॅश बूम'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ट्रॅश बूममुळे नदी, नाले आणि समुद्रात तरंगणारा कचरा अडवला जातो. प्रामुख्याने नाल्यांच्या तोंडावर लावल्या जाणाऱ्या ट्रॅश बूममुळे कचरा समुद्रात जाण्यापासून रोखला जातो आणि तो सहजपणे गोळा करून विल्हेवाट लावता येते. महानगरपालिकेकडे एकूण १४ ट्रॅश बूम आहेत. तसेच आवश्यक त्या ठिकाणी 'ट्रॅश बूम' चा वापर करावा,असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांनी ऑक्टोबर २०२० रोजी पारित केलेल्या आदेशात मुंबई महानगरपालिकेला खारफुटीचा भाग प्लास्टिक मुक्त ठेवण्याकरिता नाले आणि नद्यांमधील तरंगता कचरा वाहून समुद्रात थेट जाण्यापासून रोखण्याकरीता योग्यती कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच तरंगता प्लास्टिक व इतर कचरा जमा करुन त्याची विल्हेवाट लावण्याकरिता ट्रॅश बुम बसविण्याची शिफारस केलेली होती. त्यानुसार विविध नाल्यांतील तरंगता कचरा जमा करणे, बाहेर काढणे व त्याची विल्हेवाट लावण्याकरीता ट्रॅश बुमसहित तराफा आरुढ कचरा वाहक प्रणालीचा बसवून कार्यवाही केली जात आहे. मुंबईत पूर्वी १६ ठिकाणी या प्रणालीचा वापर करण्यात येणार होता, त्यातील प्रत्यक्षात ८ ठिकाणीच याचा वापर करण्यात येणार होता आणि ०८ उर्वरीत ठिकाणी सीएसआर निधीतून ही प्रणाली बसवण्यात येणार होता. सीएसआर निधीतून या प्रणालीचा वापर केल्यामुळे यावर होणारा म हापालिकेचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला गेला आहे.

मात्र, आतापर्यंत म हानगरपालिकेला एकूण १४ ट्रॅश बूम बसवण्यात यश आले आहे. यात मोगरा नाला, मजास नाला , मानखुर्द नाला, सोमय्या नाला, वाकोला नाला व दादर - धारावी नाल्याच्या ठिकाणी अधिक प्रभावीपणे काम काज करावे लागणार आहे. या सर्वठिकाणी 'ट्रॅश बूम' आणि अन्य यंत्रसामुग्री तैनात करावी. पर्जन्य जल वाहिन्यांची सुरु असलेली सर्व कामे ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण करावीत. रेल्वे प्रशासन, मेट्रो प्रशासन यांच्या समवेत संयुक्त दौरा करावा. रेल्वे तथा मेट्रो कार्यस्थळी भेटी देऊन पाहणी करावी, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी दिले आहे.

नालेसफाईच्या कामांसाठी डॅशबोर्ड

नागरिकांना नाल्यातील गाळ काढण्याच्या कामाची इत्यंभूत माहिती मिळावी म्हणून महानगरपालिका प्रशासनाने महानगरपालिका संकेतस्थळावरील डॅशबोर्डवर छायाचित्रं तथा चित्रफीती उपलब्ध करून दिल्या आहेत. जेणेकरून नागरिकांना त्यांच्या परिसरातील नाल्यांमधून गाळ उपसा कामांचे तपशील पाहता येतात. त्यामुळे नाल्यातून गाळ काढल्यानंतर गाळाची तत्काळ वाहतूक सुरू करावी. जेणेकरून 'डॅशबोर्ड'वर त्याची माहिती तत्काळ सार्वजनिकरित्या प्रदर्शित होईल. तसेच, नागरिकांना वास्तविक वेळेत (रिअल टाइम) प्रगती पाहता येईल. डॅशबोर्डची लिंक नागरिकांबरोबरच लोकप्रतिनिधी, प्रसार माध्यमे, समाज माध्यमे यांना उपलब्ध करून द्यावी, असे गगराणी यांनी नमूद केले.

# माझी काळी आई मला परत द्या, अशोक खरातसह मध्यस्थ्यांनी केली आमची फसवणूक; ९० वर्षांच्या शेतकरी आजीची आर्त हाक

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** एका शेतकऱ्यासाठी त्याची शेतजमीन म्हणजे केवळ मालमत्ता नसते, तर ती त्याची 'काळी आई' असते. ज्याप्रमाणं एक आई आपल्या मुलाचं संगोपन करते, तशीच ही जमीन शेतकऱ्याच्या संपूर्ण कुटुंबाचं पोट भरते. परंतु, राज्यात सध्या गाजत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातचा शेतजमीन फसवणुकीचा एक गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भोंदूबाबा अशोक खरात आणि मध्यस्थ्यांनी गोंदकर कुटुंबीयांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळं परिसरात मोठी खळबळ उडाली असून पीडित कुटुंबीयांनी शिर्डी पोलीस तसंच नाशिकमधील एसआयटीकडं तक्रार दाखल केली आहे.

शिर्डीतील रावसाहेब गोंदकर यांची निघोज हद्दीत वडिलोपार्जित सुम ारे ४ एकर शेती होती. या जमिनीवर गोंदकर कुटुंबीय शेती करून आपला उदरनिर्वाह करत होते. या परिसरात पंचतारांकित हॉटेल उभारल्यानंतर ही जमीन मोक्याच्या ठिकाणी आली आणि तिचं बाजारमूल्य वाढलं. त्यामुळंच भोंदूबाबा अशोक खरातची नजर या जमिनीवर पडली. रावसाहेब गोंदकर यांच्या भोळेपणाचा फायदा घेत काही व्यक्तींनी त्यांच्याशी जवळीक वाढवली. त्यानंतर त्यांच्या मुलाला दारुच्या नशेत ठेवून संगनम तानं जमिनीचा व्यवहार भोंदूबाबा अशोक खरात यांच्या नावावर करून घेतला, अशी माहिती गोंदकर कुटुंबीयांनी दिली.

नातेवाईक आणि गावातील नागरिकांकडून फोन आल्यानंतर गोंदकर कुटुंबीयांना जमीन विक्री झाल्याची माहिती मिळाली. याबाबत मुलगा रावसाहेब याच्याकडं चौकशी केली. यावेळी त्यानं २२ ऑगस्ट २०२३ रोजी सुमारे ५ कोटी ५२ लाख रुपयांच्या मोबदल्यात जमीन विक्री केल्याचं सांगितलं. मात्र, संबंधित व्यवहारातील रक्कम कुटुंबीयांसह रावसाहेबला मिळालेली नाही. मुलगा रावसाहेब याच्या एका मित्रानं व्यवहार करून पैसे स्वत:कडं ठेवले. तसंच या व्यवहारातून आमच्या कुटुंबाला एकही रुपयाही मिळालेला नाही, असं गोंदकर कुटुंबीयांनी सांगितलं.

'शेतकरी रावसाहेबच्या मित्रानं संबंधित भोंदूबाबा अशोक खरात यांच्याकडून दोन टक्के व्याजानं पैसे घेतले होते. कर्ज फेडता न आल्याम ुळं त्यानं आमच्या कुटुंबाची जमीन खरातला विकल्याचं सांगितलं.

# राज्याच्या प्रशासकीय सुधारणांमध्ये नागपूर महसूल व पोलीस विभागाची दमदार कामगिरी

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री अतिथी गृह येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांचा गौरव
- १५० दिवस ई-गव्हर्नन्स मोहिमेमध्ये महसूल, पोलीस आणि जिल्हा परिषदेला अनुक्रमे प्रथम, द्वितीय पुरस्कार

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** लोकाभिमुख व तत्पर पारदर्शक प्रशासनाच प्रत्यय सर्वसामान्यांना यावा, शासकीय कार्यालयाच्या कार्यपद्धतीमध्ये बदलत्या तंत्रज्ञानानुरूप कार्यपद्धतीत सुधारणा व्हाव्यात या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स मोहिमेमध्ये महसूल, पोलीस आणि जिल्हा परिषद असा तिहेरी सन्मान झाला. राज्यातील विभागीय आयुक्त कार्यालयांच्या गटात नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाला प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. याचबरोबर विशेष पोलीस महानिरीक्षक ( ) कार्यालय, नागपूर परिक्षेत्र यांना ई-गव्हर्नन्स व वेबसाईट विकास क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीबद्दल व नागपूर नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाला आपले सरकार प्रणाली, ई ऑफिस, व्हाट्सअप चॅटबॉटसाठी द्वितीय क्रमांकाच्या पुरस्काराने सन्मानित केले. नागपूर जिल्हा परिषदेला प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमतेत वाढ आणि निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी विकसित केलेल्या ''झेडपी पॅनोरमा'' या डॅशबोर्डसाठी गौरविण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या अपूर्व यशाबद्दल पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार व विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्यावतीने अपर आयुक्त राजेश खवले यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित समारंभासाठी माहिती तंत्रज्ञान तथा संस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या मोहिमे अंतर्गत कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफीस,



कार्यालयाचा डॅशबोर्ड, व्हॉट्सऍप चॅटबॉट, ए आय व ब्लॉकचेनचा शासकीय कामकाजात वापर आणि जीआयएस चा कामात वापर अशा एकूण ७ सर्वंकष मुद्यांवर नागपूरने विशेष कामगिरी केली.

नागपूर विभागाने या मोहिमेमध्ये केलेली कामगिरी ही आदर्श मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले कौतुक

नागपूर विभागाच्या या अपूर्व कागिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचे विशेष कौतुक केले. ''ई-गव्हर्नन्स ही केवळ तांत्रिक संकल्पना नसून नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचे प्रभावी साधन आहे. सर्वसामान्यांच्या विकासासाठी, त्यांना सुखकर प्रशासनाचा प्रत्यय देण्यासाठी नागपूर विभागाने या मोहिमेमध्ये केलेली कामगिरी ही आदर्श आहे'' या शब्दात त्यांनी कौतुक केले.

या मोहिमेतील कार्यपद्धती अधिक सक्षम होत जावी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

सर्वसामान्य जनतेचे जीवनमान सुसह्य व्हावे यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून सातत्याने आपण विविध अभियान राबवितो. बदलत्या तंत्रज्ञानाचा चपखल वापर जेवढा अधिक होईल त्या प्रमाणात लोकांना उत्तम व पारदर्शी प्रशासनाचा अनुभव मिळेल. यादृष्टीने आपल्या महसूल, पोलीस व जिल्हा परिषदेने साध्य केलेले यश महत्त्वाचे आहे. ही कार्यपद्धती अधिक सक्षम होत जावी व प्रत्येकाला उत्तम प्रशासनाची अनुभूती मिळावी असे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगून संबंधित अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, ''हा पुरस्कार संपूर्ण नागपूर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे द्योतक आहे. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रशासन अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न राहील. भविष्यातही अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जलद, सुलभ आणि दर्जेदार सेवा पुरविण्यावर भर दिला जाईल.'' असे त्यांनी सांगितले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हतेच्या त्रिसूत्रीवर सर्व विभागांनी काम करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## १५० दिवसांच्या ई- गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागांचा गौरव

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नागरिकांना सर्व शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ एकाच माध्यमातून मिळण्यासाठी आणि विकसित महाराष्ट्राचे ध्येय साध्य करताना प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हता या त्रिसुत्रीच्या आधारावर सर्व विभागांनी काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत निवडलेली उत्कृष्ट कार्यालये व सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या उत्कृष्ट कार्यालय प्रमुखांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान तथा संस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह सर्व मंत्रालय विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव सचिव यांच्यासह १५० दिवसांच्या ई- गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणारे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष व दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

**माहिती व तंत्रज्ञान विभागाने एक राज्य, एक पोर्टल संकल्पना राबवावी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सांगितले की, माहिती तंत्रज्ञान विभागाने एक राज्य, एक पोर्टल ही संकल्पना राबवावी. शासनाच्या अनेक वेगवेगळ्या संकेतस्थळांमुळे नागरिकांचा होणारा संभ्रम टाळण्यासाठी सर्व सेवांचे एकत्रीकरण असलेले एकच पोर्टल माहिती व तंत्रज्ञान विभागाने तयार करावे. सर्व शासकीय सुविधा नागरिकांना सहजरित्या उपलब्ध होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने प्राधान्याने काम करावे.

महाआयडी प्रणालीच्या माध्यमातून नागरिकांसाठी एक विशिष्ट महाआयडी तयार करण्यात येईल. आणि केवळ एका आयडीच्या आधारावर सर्व शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. ज्यामुळे डेटा फिल्टर होऊन सेवांचा दुरुपयोग थांबण्यास मदत होईल. यासोबतच अनेक विभागांचे कामकाज हे बहुतेक प्रमाणात ई- ऑफीस झाले असून ते लो पेपर वरून नो पेपरवर नेण्यासाठी मुख्य सचिवांनी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा, अशा सूचनाही यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

**महासारथी' मुळे सर्व शासकीय डेटा एकत्रित होण्यास मदत**

या कार्यक्रमा दरम्यान माहिती तंत्रज्ञान विभागाने तयार केलेल्या महासारथी या संकेतस्थळाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महासारथी संकेतस्थळाचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री म्हणाले की, हे संकेतस्थळ म्हणजे आपली डेटा बँक आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून सर्व शासकीय डेटा एकत्रित करण्यात आला असून त्याद्वारे एकमेकांशी संवाद साधता येईल. तसेच नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी महाराष्ट्र इंटिग्रेटेड डेटा एक्सचेंज तयार करत असून ज्यामुळे डाटा ड्रिव्हन निर्णय प्रक्रिया राबविता येणे शक्य होणार आहे.

**महा-विस्तार हे एआय ॲप्लिकेशन देशात पथदर्शक**

एआय आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे अहोरात्र अविरत सेवा देण्यासाठी जनरेटिव्ह एआय आणि चॅटबॉट्स, ब्लॉकचेन यांचा वापर वाढवण्यावर अधिक भर दिला जाणार आहे. या अंतर्गत कृषी विभागाने तयार केलेले महा-विस्तार हे एआय ॲप्लिकेशन देशात पथदर्शक ठरले असून, त्यात आदिवासी भाषांचाही समावेश करण्यात आला आहे. यामध्ये शेतीशी संबंधित सर्व माहिती, हवामान अंदाज याबाबत देखील माहिती उपलब्ध आहे. इतरही विभागांनी कृषी विभागाने तयार केलेल्या या महा-विस्तार एआय प्रणाली सारखे एआयचा उपयोग करून काही वेगळे करण्यायसाठी प्रयत्न करावेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी यावेळी सांगितले.

प्रशासकीय कामगिरीत गेल्या १५०-२०० दिवसांत ४२ विभागांचा आढावा घेऊन या काळात साधारण ४०,००० पदांवर अधिकारी - कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे, ज्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामात गतिमानता आली आहे. तसेच प्लॅटफॉर्मवर महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्सच्या कालावधीतील पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला असल्याने सर्व शासकीय विभागाचे आणि सहभागी कर्मचाऱ्यांचे आणि सेवाकर्मीचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी अभिनंदन केले.

**१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेले शासकीय कार्यालय:**

**सर्वोत्तम मंत्रालयीन विभाग** : सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, परिवहन आणि बंदरे विभाग, पर्यावरण आणि वातावरण बदल विभाग, शालेय शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग

**सर्वोत्तम विभागीय आयुक्त:** नागपूर, छत्रपती संभाजीनगर

**सर्वोत्तम जिल्हाधिकारी:**

जळगाव, ठाणे, धाराशिव, लातूर, कोल्हापूर

**सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी :**

पुणे, सांगली, ठाणे, नागपूर, नाशिक

सर्वोत्तम पोलीस अधीक्षक: ठाणे (ग्रामीण), नागपूर (ग्रामीण), अकोला, पुणे (ग्रामीण), रत्नागिरी

**सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त :**

पनवेल, पुणे, उल्हासनगर, नवी मुंबई, अमरावती

**सर्वोत्तम पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक/उपमहानिरीक्षक**

नांदेड, नागपूर

सर्वोत्तम पोलीस आयुक्त: नाशिक, ठाणे, नागपूर

याशिवाय या कार्यक्रमात सर्वोत्तम आयुक्त/संचालक, सर्वोत्तम शासकीय संस्था/मंडळे आणि कंपन्या यांच्यासह सेवाकर्मी कार्यक्रमाअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणारे सचिव, शासकीय कार्यालये/आस्थापना यांना सुध्दा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# 'उजास'तर्फे लातूरमधील आशा सेविकांमध्ये मासिक पाळीच्या आरोग्याविषयी जागरूकतेचा प्रसार

दैनिक आपला विदर्भ



**लातूर/प्रतिनिधी :** आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा प्रमुख उपक्रम असलेल्या 'उजास'ने लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कमध्ये 'पीरियड मेळा' या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. याद्वारे संस्थेने तळागाळापर्यंत मासिक पाळीच्या आरोग्याविषयी जागरूकता आणि स्वच्छता व्यवस्थापनाला चालना देण्याची आपली कटिबद्धता बळकट केली. या कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील २२८ आशा सेविका एकत्र आल्या. आघाडीवरील आरोग्य शिक्षक म्हणून त्यांच्या क्षमतेला बळकट करण्यावर यामध्ये लक्ष केंद्रित करण्यात आले.

केवळ जागरूकता निर्माण करण्यापुरते मर्यादित न राहता क्षमता बांधणीच्या माध्यमातून समुदायाच्या नेतृत्वाखालील बदल शक्य करण्याच्या उजासच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा एक भाग आहे. आशा सेविकांना योग्य ज्ञान आणि साधनांनी सुसज्ज करून सर्वांत तळागाळातील महिला आणि किशोरवयीन मुलींपर्यंत अचूक, व्यावहारिक आणि प्रवादरहित माहिती पोहोचेल, हे सुनिश्चित करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमाला लातूरचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बारुरे, महिला व बाल कल्याण विभाग, लातूर येथील जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री. जावेद शेख, लातूरचे उप शिक्षण अधिकारी (माध्यमिक) श्री. क्षीरसागर, लातूर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे उपायुक्त श्री. पंजाबराव खानसोले, लातूरच्या आशा जिल्हा समन्वयक संगीता डवरी आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान, लातूर येथील डीएमएम आयबीसीबी श्री. अल्ताफ जिकारे यांसारख्या मान्यवरांनी उपस्थित राहून शोभा वाढवली. यावेळी समाजाच्या वर्तणुकीत बदल घडवून आणण्यात आणि मासिक पाळीच्या आरोग्याचे परिणाम सुधारण्यात आशा सेविकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर मान्यवरांनी प्रकाश टाकला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले आणि उजासच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रशंसा केली. तसेच, निरोगी समाज निर्माण करण्यासाठी आणि महिला व किशोरवयीन मुलींचे स्वास्थ्य सुधारण्यासाठी आशा कार्यकर्त्यांना अचूक ज्ञानाने सुसज्ज करणे महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी भर दिला.

पीरियड मेळा या कार्यक्रमाचे आयोजन संवादात्मक आणि सहभागी व्यासपीठ म्हणून करण्यात आले. यामध्ये मासिक पाळीच्या स्वच्छतेचे व्यवस्थापन, सुरक्षित प्रथा आणि संसर्ग प्रतिबंध या विषयांवर माहितीपूर्ण स्टॉल्स, प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शनपर चर्चा यांचा समावेश होता. मासिक पाळीबद्दलच्या खोलवर रुजलेल्या गैरसमजुती दूर करण्यावर यामध्ये विशेष भर देण्यात आला. त्यामुळे आशा कार्यकर्त्यांना समुदाय पातळीवर आत्मविश्वासाने संवाद सुरू करता येईल आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होईल.

उपक्रमाच्या धोरणात्मक दिशेची माहिती देताना 'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्या, ''निव्वळ जनजागृतीकडून मासिक पाळीच्या आरोग्य व्यवस्थापनासाठी एक शाश्वत परिसंस्था उभारण्याकडे 'उजास'ची उत्क्रांती होत आहे. 'आशा' सेविकांच्या क्षमतेमध्ये गुंतवणूक करून, आम्ही सातत्यपूर्ण आणि स्थानिक बदल घडवून आणू शकणाऱ्या कुशल सामुदायिक आरोग्य समर्थकांचे एक नेटवर्क उभारत आहोत. या मॉडेलमधून विस्तारक्षमता आणि दीर्घकालीन शाश्वतता यांची सुनिश्चिती होते, तसेच शेवटच्या टप्प्यापर्यंत सेवा पोहोचवण्यास मदत होते. दिल्लीतील आमच्या अलीकडील प्रवेशासोबतच महाराष्ट्राबाहेर आम्ही जसजसा विस्तार करत आहोत, तसतसे या दृष्टिकोनामुळे आम्हाला विविध भौगोलिक प्रदेशांमध्ये चिवट, समुदाय-केंद्रित प्रणाली तयार करणे शक्य होईल.''

या कार्यक्रमाचा समारोप एका सशक्त संदेशाने झाला. यामध्ये आशा सेविकांना आपापल्या समुदायांमध्ये स्वच्छतेच्या सवयींना प्रोत्साहन देणे, सामाजिक रूढींना आव्हान देणे आणि मासिक पाळीच्या आरोग्याविषयी मोकळ्या संवादांना चालना देणे यांसारख्या बदलाचे माध्यम म्हणून कार्य करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून उजास मासिक पाळीच्या आरोग्य व्यवस्थापनासाठी एक शाश्वत, समुदाय-आधारित परिसंस्था निर्माण करत आहे.

## मराठी अभिनेत्रीला झाला ब्रेस्ट कॅन्सर

**मुंबई/प्रतिनिधी :**मराठी सिनेविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री राजश्री देशपांडे सेक्रेड गेम्स,मँटो आणि ब्लॅक वॉरंट यांसारख्या सिनेमामध्ये झळकली आहे. आपल्या दमदार अभियनाने राजश्रीनं प्रेक्षकांची मने जिंकली. नुकताच या अभिनेत्रीनं सोशल मिडियावर एक पोस्ट करत तिच्या आयुष्यातील सर्वात कठीण टप्प्याबद्दल खुलासा केला असून तिने स्तनाच्या कर्करोगावरील शस्त्रक्रियेचा अनुभव चाहत्यांसोबत शेअर केला आहे. या पोस्टमध्ये राजश्रीने सांगितले की जेव्हा तिला पहिल्यांदा कर्करोगाचं निदान झाल्याचे समजले, तेव्हा ती रुग्णालयात एकटीच होती. त्या क्षणी ती मानसिकदृष्ट्या कोलमडून गेली होती. राजश्रीनं लिहिलयं की, तिला जेव्हा या आजाराचे निदान झाले तेव्हा ती पूर्णपणे खचून गेली होती. ती एकटी बसून रडण्याचा तो क्षण तिला आजही आठवतो.

त्यावेळी तिच्या मनात अनेक प्रश्न होते, पण त्यापैकी एकाही प्रश्नाचे स्पष्ट उत्तर तिच्याकडे नव्हते. या पोस्टमध्ये पुढे राजश्री म्हणाली असे काही दिवस असतात जेव्हा माझ्यात ताकद नसावी असे वाटते. मला फक्त शांत राहायचे असते. मेरी ऑलिव्हरचा कवितेतल्या त्या चिमण्यासारखे, ज्या माझ्या खिडकीतल्या बोगनव्हिलियावर बसून माझ्यासोबत सूर्योद्याकडे बघत बसतात. पण आज मी ते करून दाखवलं. मी स्वत:साठी एक स्माईल आणि एक मिठी मिळवली आणि त्या सर्व लोकांचा विचार केला जे प्रवासात माझ्यासोबत आहेत, ज्यांनी फोन केला, मेसेज केले आणि मला खूप प्रेम दिलं. मला माहित आहे की उद्या मी लढण्यासाठी आणखी तयारी करत असेन, पण आजचा दिवस प्रेमाचा असू दे. असं तिने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.


## शब्दकोडे क्र. 94

आडवे शब्द

१. मारुती ५. लाकडाची (वस्तू) ८. राग ११. जास्तीत जास्त व कमीत कमी १३. रणांगण १४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस १५. पातळ खांब १६. बातमीदार १७. पुन्हा १८. संगीतसम्राट २१. रेती २३. हिंदीत माळ २४. प्रख्यात, प्रसिद्ध २६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप २८. मांडणी २९. राजाची पत्नी ३०. विधवेशी लग्न ३२. धुंदी ३३. सापाने टाकलेली त्वचा ३४. पवित्र ३६. कमळ ३७. झोपडी ३८. वर-वधुमधील पडदा ३९. घागरा ४१. धार्मिक गट ४२. आकाश ४४. पिता ४५. फळांचे पेय ४६. रद्द ४७. जन्म-मृत्यू ४९. आणि ५०. नशा आणणारा, कैफी ५२. लोणच्यातील द्रव मसाला ५४. गर्दभ ५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन ५६. फुलांची माळ ५७. एकापेक्षा दुसरा वरचढ ५९. हुक्की, लहर ६०. चौथा हिस्सा ६१. खटला, हक्क सांगणे ६२. एकावर एक रचलेले ६४. नाव हाकणारा ६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी) ६६. जाळण्यायोग्य ६७. धमनी

उभे शब्द

२. तोटा ३. आईचा भाऊ ४. -- दमयंती ५. तिबेटी धर्मगुरु ६. दयाळू ७. युद्ध ८. साथसोबत ९. तणाव १०. अवघड, कष्टप्रद १२. चावी १३. पत्नी १४. राहण्याची जागा १५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा १७. पळून जाणे १९. सेनापती २०. वाकण्याची क्रिया २१. वायू, वारा २२. रक्त सांडणे २३. भडीमार २५. नमस्कार २६. विश्वासघातकी २७. गुणाकार ३१. सरसकट ३३. खर्चात कपात ३४. वार्ता, समाचार ३५. बाळभाषते पाणी ३६. प्रधानमंत्री ४०. तीव्र ऊन ४३. जाणकार ४३अ. नम्र, वाकलेला ४४. ढग (सं), भरभर ४५. अखेरीस ४७. लोकसंख्येची मोजणी ४८. यजमान ५०. मावशीचा मुलगा ५१. गोष्टी सांगणे ५२. संसद सदस्य ५३. रसपूर्ण ५८. उग्र वासाची एक पालेभाजी ६३. फळातील द्रव



### शब्दकोडे क्र. 93 चे उत्तर

आडवे उत्तर

१.धुंद येथ मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले ९.दीर १०.टाक ११.कुत्रा १२.वायव्य १४.कणीदार १६.रचनाकर १९.राजा २०.थारा २१.हत्या २२.नवार २४.व २५.वानर २७.यच्चयावत ३०.हराम खोर ३२.वडवानल ३३.सटरफटर ३६.महती ३८.कद ४०.मदार ४१.हार ४२.वा ४३.सटवाई ४५.रफ ४६.कप ४९.काल ५०.खारट ५२.लघळपणा ५४.रत्नजडित ५५.नाना ५६.वासा ५८.मळमळणे ५९.सन ६१.पुणे ६२.वेताळ ६४.खरा ६५.कळ ६६.रामराम ६८.पारावार ६९.तपास ७१.मरुत ७३.जननमरण ७४.वाऱ्यावरची वरात

उभे उत्तर

१.धुंदी २.दरवाजा ३.मीन ४.रमणीय ५.तोटा ६.मकर ७.चेतना ८.लोकुरवाळा १३.व्यथा १५.रहस्यमय १७.चलन १८.कान १९.रामायण महाभारत २३.मायावती २५.वारसदार २६.रबर २८.वड २९.तवाना ३०.हलकट ३१.पोरका ३४.टरफल ३५.फटकळ ३७.हर ३९.दवाखाना ४३.सल ४४.ईर ४७.पपनस ४८.सजविणे ४९.कातरवेळ ५१.टवाळ ५३.घटणे ५५.नाताळ ५७.सामदाम ५८.मलम ६०.नवरस ६१.पुरातन ६३.सैरावैरा ६५.कसम ६६.रातवा ६७.राघव ७०.पान ७१.मण ७२.चाची

# मेहकरात धमकीच्या व्हिडिओवरून खळबळ

## शिवसेनेचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन

## आमदाराला धमकी देणे पडले महागात; काही तासांतच गुन्हा दाखल!

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील आमदाराला उद्देशून समाजमाध्यमांवर प्रसारित झालेल्या आक्षेपार्ह व धमकीजनक व्हिडिओ प्रकरणी प्रथम शिवसेनेकडून पोलिसांकडे निवेदन देण्यात आले आणि त्यानंतर काही तासांतच पोलिसांनी संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घडामोडींमुळे तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संदीप बाबुराव तट्टे (रा. महादेव वेटाळ, मेहकर) याने फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप व इन्स्टाग्राम यांसारख्या समाजमाध्यमांवर एक व्हिडिओ प्रसारित केला होता. या व्हिडिओमध्ये मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात





तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याबाबत आक्षेपार्ह व भडकाऊ वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप आहे. कामाचे श्रेय घेऊ नका, अन्यथा चपलेने मारहाण करू. घरातून बाहेर काढून मारू अशा प्रकारची धमकीची भाषा वापरण्यात आल्याचेही समोर आले आहे.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच मेहकर पोलीस ठाण्याचे ठाणेदार व्यंकटेश्वर आलेवार यांना निवेदन सादर करून तात्काळ कारवाईची मागणी केली.

या वेळी नगराध्यक्ष किशोर गारोळे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवा शिवसेनेचे तालुकाप्रमुख अ‍ॅड. आकाश घोडे, नगरसेवक महेश रिंढे, नितीन तुपे, नगरसेवक अमर घोडे, अ‍ॅड. संदीप गवई यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, या प्रकरणी फिर्यादी शाम देवानंद निकम (वय ४०, रा. नायगाव दत्तापुर, ता. मेहकर, जि. बुलडाणा) यांनी मेहकर पोलीस ठाण्यात तोंडी तक्रार दिली. ते शेती व्यवसाय करीत असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात मेहकर-लोणार तालुका संघटक प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधित संदीप तट्टे विरुद्ध भारतीय न्याय संहिता () २०२३ अंतर्गत कलम ३५६ (अपमानास्पद/मानहानीकारक कृत्य) व कलम ३५१ (गुन्हेगारी धमकी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारामुळे आमदार व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली असून, परिसरात काही प्रमाणात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेमुळे मेहकर तालुक्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

---

## वृत्तविशेष...

### इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर मंत्र्यांचे दौरे थांबवा, ताफ्यातील वाहनं कमी करा, राज्य सचिवांना आवाहन

**रायगड/प्रतिनिधी :** अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध थांबायची चिन्ह दिसत नाहीत. या युद्धाचा परिणाम जगभरातील विविध क्षेत्रांवर होत आहे. महाराष्ट्रात गॅस टंचाईचं संकट आहे. तसंच इंधन टंचाई देखील होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, अशी कोणतीही टंचाई नसल्याचं स्पष्टीकरण राज्य सरकारनं दिलं आहे. तरी देखील नागरिक चिंतेत आहे. पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी नागरिकांनी पेट्रोल पंपांवर गर्दी केली आहे.

जनतेच्या पैशांचा अपव्यय टाळण्याची गरज – आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्ध परिस्थितीचा थेट परिणाम इंधन पुरवठा आणि वापरावर होताना दिसत आहे. देशासह राज्यात संभाव्य इंधन टंचाईची शक्यता लक्षात घेता शासन विविध पातळ्यांवर उपाययोजना करत आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर जनतेच्या पैशांचा अपव्यय टाळण्याची गरज अधोरेखित करत माजी आमदार तथा भाजपा नेते पंडित पाटील यांनी राज्य शासनाला महत्त्वपूर्ण सूचना केल्या आहेत.

मंत्र्यांचे दौरे रद्द करा – मंत्र्यांचे अनावश्यक दौरे तातडीनं थांबवावेत, तसंच झेड सिक्युरिटीधारक मंत्री आणि खासदारांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी करावी, अशी मागणी त्यांनी राज्याच्या सचिवांकडं केली आहे. केवळ अत्यावश्यक आणि जनहिताशी संबंधित कामांसाठीच दौरे व्हावेत, अन्यथा ऑनलाइन माध्यमातून बैठका आणि संवाद साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकप्रतिनिधींनी परिस्थितीची दखल घ्यावी – यामुळे मोठ्या प्रमाणात इंधनाची बचत होऊन भविष्यातील संभाव्य संकटाला तोंड देणे सोपे जाईल, असा विश्वास पंडित पाटील यांनी व्यक्त केला. ''राज्य हे जनतेच्या पैशातून चालते, त्यामुळे त्या पैशाचा योग्य आणि जबाबदारीने वापर होणे गरजेचे आहे,'' असे सांगत त्यांनी लोकप्रतिनिधींनी परिस्थितीची गांभीर्याने दखल घ्यावी, असा इशाराही दिला.

### रिंकू राजगुरुने दिली प्रेमाची कबुली, तुझ्या प्रेमात वेडी झालीये म्हणत केली ही पोस्ट

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राची आर्ची म्हणून प्रसिद्ध असलेली अभिनेत्री रिंकू राजगूरू ही सोशल मिडियावर सक्रिय असून रिंकूचा आयुष्यातील खरा परशा कोण आहे? हे जाणून घेण्यासाठी चाहते कायम उत्सुक असतात.

रिंकु सतत आपले कुणासोबतही काही रिलेशन नाही असे सांगत असते. पण, काही दिवसांपूर्वीच तिनं तिच्या आयुष्यात कुणीतरी होतं याची कबुली दिली होती. अशातच आता रिंकूनं इन्स्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट केली आहे. ज्याची सुरुवात डार्लिंग अशी आहे आणि तुझ्या प्रेमात वेडी झालीये, असे रिंकू सांगते. रिंकूने तिच्या पोस्टला 'आय एम सो इन लव्ह विथ यू' हे इंग्रजी गाणे लावले आहे. या गाण्यात मी तुझ्या प्रेमात पडले आहे. तुझ्यासाठी वेडी झाले आहे. तुझ्यावरून क्षणभरही नजर हटवू शकत नाही, अशा ओळी आहेत. या पोस्टमध्ये रिंकूने आपल्या प्रेमाची कबूली दिली आहे. मात्र, ही कबूली देत रिंकूनं या पोस्टमध्ये खाली एक नावही दिले आहे. रिंकूनं ज्याच्यासाठी ही पोस्ट केली आहे त्याचं नाव रोमिओ आहे. पण, हा रोमिओ तिचा प्रियकर नसून हा रिंकूचा पेट डॉग आहे. रिंकूने याच पोस्टमध्ये फोटोही टाकला आहे ज्यामध्ये एक छोटा टेडी आणि त्याच्यामागे छोटा पपी अर्थात रिंकूचा रोमिओ दिसत आहे. या फोटोत रिंकूनं रोमिओ नावासोबत हार्ट आणि डॉगचे फुटप्रिंट्सही टाकले आहेत.

### जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व सिलिंडरचा मुबलक साठा; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** आखाती युध्दाच्या पार्श्वभुमीवर पेट्रोलियम पदार्थ व इंधन पुरवठ्याबाबत अफवांचे पीक आले आहे. मात्र नागरिकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये. आजघडीला जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरचा साठा मुबलक प्रमाणात असून ७ लक्ष ५ हजार ८६१ लिटर पेट्रोल, ५ लक्ष ९३ हजार ८९२ लिटर डिझेल आणि ६७७४ घरगुती वापराचे सिलिंडर जिल्ह्यात उपलब्ध आहे. तसेच कंपन्यांकडून याचा पुरवठा देखील नियमित होत असल्याचे राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पेट्रोलपंपधारक, गॅस एजन्सीचे मालक आणि कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत पालकमंत्री डॉ. वुईके यांनी आढावा बैठक घेऊन जिल्ह्याची परिस्थिती जाणून घेतली. बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, अपर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे, जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादुरकर यांच्यासह पेट्रोलपंप आणि गॅस एजन्सीधारक उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, पेट्रोल पंपावर पेट्रोल – डिझेलचा साठा उपलब्ध असून पेट्रोलियम कंपन्यांकडून पुरवठा नियमित सुरू आहे. व्यावसायिक सिलिंडर पुरवठ्याबाबत थोडी अडचण असली घरगुती गॅस सिलिंडरसुध्दा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. पेट्रोलपंप आणि गॅस एजन्सीधारकांनी रोजचा आपल्याकडे किती साठा उपलब्ध आहे, त्याची माहिती प्रशासनाला द्यावी. सिलिंडर डिलिव्हरी करणाऱ्यांकडून अपप्रचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एजन्सीधारकांनी आपापल्या स्टॉफच्या माध्यमातून नियमित पुरवठ्याबाबत सकारात्मक संदेश घरोघरी ग्राहकांपर्यंत पोहचवावा. प्रथम बुकिंग करणाऱ्यांना तारखेनुसार सिलिंडर वाटप सुरू आहे. कुठेही टंचाई नाही. क्रमानुसार बुकिंग करणाऱ्यांना सिलिंडरचे वाटप करण्यात येणार आहे, त्यामुळे नागरिकांनी संयम ठेवावा. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. शासन-प्रशासन आणि पेट्रोलपंप तसेच गॅस एजन्सीधारकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले.

---

## इरई नदी खोलीकरणासाठी लोकसहभाग महत्त्वाचा – पालकमंत्री डॉ. अशोक वुईके

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूरच्या प्रवेशद्वारावरच इरई नदीचे दर्शन होते. विकासाच्या बाबतीत चंद्रपूर जिल्ह्याचा कायापालट झाला आहे. मात्र इरई नदीचे खोलीकरण दुर्लक्षित राहून गेले. त्यामुळे गतवर्षी २०२५ मध्ये नदीचे खोलीकरण करण्याचा संकल्प केला. या संकल्पचा दुसरा टप्पा आजपासून सुरू करण्यात आला आहे. ही नदी आपली आहे, आपल्या शहराची आहे, ही आपली जीवनदायी आहे, अशी भावना ठेवून चंद्रपूरकरांनी यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले.

चंद्रपूर शहरातील विठ्ठल मंदिर प्रभाग येथे इरई नदीचे खोलीकरण अभियानाचा शुभारंभ करताना ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला महापौर संगीता खांडेकर, आमदार किशोर जोरगेवार, उपमहापौर प्रशांत दानव, मनपा स्थायी समिती सभापती मनस्वी गिऱ्हे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, अपर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे, प्रभागाचे नगरसेवक भालचंद्र दानव, किरण कोतपल्लीवार यांच्यासह उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार विजय पवार, उपायुक्त संदीप चिद्रावार, सहाय्यक आयुक्त संतोष गर्गेलवार, शुभांगी सूर्यवंशी, सीटीपीएसचे प्रभारी मुख्य अभियंता रवींद्र सोनकुसरे आदी उपस्थित होते.

खोलीकरणाचे काम यावर्षी लवकर सुरू करण्यात आले आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले, सर्वांनी ही नदी आपली आहे, असे समजण्याची गरज आहे. खोलीकरणासाठी लोकचळवळ निर्माण व्हावी. कोणीही याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये. लोकसहभाग वाढविण्यासाठी जनजागृती करावी. नदीच्या कामात चुका काढण्याची मानसिकता ठेवू नका. नदी ही कायम राहणार आहे, याची सर्वांनी जाणीव ठेवावी. या नदीच्या खोलीकरणासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही तसेच कामात एका पैशाचाही भ्रष्टाचार होऊ देणार नाही, अशी ग्वाही यावेळी पालकमंत्री अशोक वुइके यांनी दिली. मनपाने प्रभागनुसार व यंत्रणानुसार वेळापत्रक तयार करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

---

## बुलढाण्यात राजकीय संघर्ष तीव्र; संजय गायकवाड यांचा श्वेता महालेंवर जोरदार हल्ला



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील राजकारण पुन्हा एकदा तापले असून, आमदार संजय गायकवाड यांनी आमदार श्वेता महाले यांच्यावर तीव्र शब्दांत नाव न घेता टीका करत थेट आव्हान दिले आहे. माहितीच्या अधिकाराच्या मुद्द्यावरून सुरू झालेला हा वाद आता अधिकच चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

आमदार गायकवाड यांनी ''माहितीच्या अधिकाराचे हिजडे धंदे मी करत नाही, हे कोण करत आहे याची चौकशी तुम्ही तुमच्या घरात करा,'' अशा शब्दांत महाले यांच्यावर निशाणा साधला. तसेच ''आमचे काम सरळ आहे, छातीला छाती भिडवून विषय संपवायचा, मागून वार करणे आम्हाला जमत नाही,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, चिखली मतदारसंघात दबाव टाकून पक्षप्रवेश घडवून आणल्याचा आरोप आमदार श्वेता महाले यांनी केल्यानंतर गायकवाड यांनी त्यास जोरदार प्रत्युत्तर दिले. ''मी महाराष्ट्रात ओळखला जाणारा आमदार आहे, पण माझ्यामुळे त्रास झाला असे एकही व्यक्ती सांगणार नाही,'' असा दावा त्यांनी केला.

यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना धमक्या दिल्या जात असल्याचाही आरोप केला. ''काम सांगितल्यावर पक्ष बदलण्याचा दबाव टाकला जातो. आमची बाळासाहेबांची शिवसेना आहे. शिवसेना चिरडण्याचा प्रयत्न झाला तर आम्ही गप्प बसणार नाही,'' असा इशाराही त्यांनी दिला.

तसेच ''आता आम्हीही पाहणार, कोण धमकी देतंय आणि कोणाला जेलमध्ये टाकलं जातंय. आमच्या कानावरही अनेक गोष्टी येत आहेत. मी काही घरात बसणारा आमदार नाही,'' असे म्हणत त्यांनी महाले यांना अप्रत्यक्ष आव्हान दिले. या वादामुळे बुलढाणा जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले असून, दोन्ही आमदारांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

## शासकीय योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी

### मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उत्साहात उद्घाटन
### ३० मार्चपर्यंत नागरिकांना घेता येणार लाभ

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या विविध लोककल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे, ही काळाची गरज आहे. मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून या योजनांची अचूक माहिती लाभार्थ्यांना मिळाल्यास त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल, असे प्रतिपादन खामगावचे उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी यांनी केले.

शेगांव येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी नगर भवनात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. पुरी यांच्या हस्ते आज संपन्न झाले. यावेळी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या प्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी यासेरोद्दीन काझी, उपसंपादक सतिश बगमारे, समाजकल्याण अधीक्षक विलास बघे, नेहा पवार, टीव्ही अँड डिजिटल मीडिया असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष फाहिम देशमुख यांच्यासह पत्रकार, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. पुरी पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्यपूर्ण आवश्यकता आहे. प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी छायाचित्र प्रदर्शन हे प्रभावी माध्यम आहे. यामुळे केवळ माहितीच मिळत नाही, तर विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये प्रशासनाप्रती विश्वास निर्माण होतो. अनुसूचित जाती, मागासवर्गीय आणि दुर्बल घटकांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांचा जास्तीत जास्त विद्यार्थी व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हा माहिती अधिकारी श्री. काझी यांनी सांगितले की, शासनाच्या योजनांची संपूर्ण माहिती एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे प्रदर्शन ३० मार्चपर्यंत दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले राहील. जिल्ह्यातील नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट देऊन शासकीय योजनांची माहिती करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान उपस्थित मान्यवर, अधिकारी कर्मचारी यांनी प्रदर्शनीची पाहणी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ लिपिक जयंत वानखडे, ललित ढोकणे, नामदेव गट्टे यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## उन्हात ताटकळणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा

# नगराध्यक्षांकडून खाजगी वाहनांची तत्काळ व्यवस्था

### नगराध्यक्षांनी स्वखर्चातून विद्यार्थ्यांच्या ये-जा करण्याची स्वीकारली जबाबदारी

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** लोणी गवळी ते घाटबोरी या मार्गावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे एसटी बस सेवा बंद असल्याने अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शनिवारी याच समस्येमुळे बसस्थानकावर विद्यार्थ्यांना कडक उन्हात ताटकळत उभे राहावे लागले. डोक्यावर तीव्र ऊन, हातात पुस्तके आणि चेहऱ्यावर शिक्षणाची ओढ. अशी हळवी परिस्थिती पाहायला मिळाली.





या घटनेची माहिती मिळताच तालुकाप्रमुख निंबाजी पांडव आणि नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी तात्काळ बसस्थानकावर धाव घेतली. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे बस त्या ठिकाणी येत नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र या परिस्थितीचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी त्वरित निर्णय घेतला. विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी कोणताही विलंब न करता खाजगी वाहनांची व्यवस्था करून विद्यार्थ्यांना त्यांच्या गावी पोहोचवले.

याशिवाय पुढील काही दिवस विद्यार्थ्यांच्या ये-जा करण्याची जबाबदारी स्वतःच्या खर्चातून उचलण्याचा निर्णयही त्यांनी घेतला. या मदतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून पालक व नागरिकांनीही नगराध्यक्षांच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. ही केवळ मदत नसून शिक्षणाबद्दलची बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीची खरी काळजी आहे, अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. यावेळी नगरसेवक महेश रिंढे, नगरसेवक नितीन तुपे तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.